सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन

## महसूल व वन विभाग

## तलाठी महापदभरती-2019

## जिल्हाधिकारी कार्यालय अहमदनगर

## जाहीर प्रगटन

क्र.मह/आस्था/कार्या.5अ-2/पदभरती/317/2020 दि.19/05/2020

अहमदनगर जिल्हाधिकारी कार्यालयाचे अधिनस्त असलेल्या उपविभागीय अधिकारी यांचे आस्थापनेवरील गट-क मधील तलाठी संवर्गातील रिक्त पदे भरण्यासाठी दि.02/07/2019 ते दि.26/07/2019 या कालावधीमध्ये महापरीक्षा पोर्टल (माहिती तंत्रज्ञान विभाग) मार्फत ऑनलाईन पध्दतीने परीक्षा घेण्यात आलेली आहे. महापरीक्षा पोर्टलमार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेमधील गुणांक व रिक्त पदे यांचा विचार करता विचारक्षेत्रात असलेल्या उमेदवारांची प्रारुप यादी दि.23/12/2019 रोजी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. तसेच दि.03/01/2020 ते दि.07/01/2020 या कालावधीमध्ये विचारक्षेत्रात असलेल्या उमेदवारांच्या मुळ कागदपत्रांची पडताळणी करण्यात आलेली आहे.

सदर पदभरतीकरीता घेण्यात आलेल्या ऑनलाईन परीक्षेमध्ये गैरप्रकार झालेबाबत तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. तसेच विचारक्षेत्रात असलेल्या उमेदवारांच्या मुळ कागदपत्रांची पडताळणी करतेवेळी काही शंकास्पद बाबी जिल्हा निवड समितीच्या निदर्शनास आलेल्या आहेत. त्यामुळे शासनाकडून याबाबत अनुषंगिक अभिप्राय व मार्गदर्शन मागविणेत आले आहे. सदर मार्गदर्शन प्राप्त झालेनंतर उक्त पदभरती संदर्भात पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

ठिकाण - अहमदनगर
दिनांक - 19/05/2020.

(संदीप निचित)
सदस्य सचिव तथा
निवासी उपजिल्हाधिकारी,
जिल्हा निवड समिती, अहमदनगर